महा मेट्रो

PUNE METRO

# फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेच्या शिष्टमंडळाकडून पुणे मेट्रो प्रकल्पाची पाहणी

फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेकडून प्रकल्पासाठी २४५ मिलियन युरो कर्ज म्हणून मिळण्याची शक्यता
पुणे, दि. ९ ऑगस्ट : महामेट्रो अंतर्गत पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी आज फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेच्या शिष्टमंडळाने पुणे मेट्रो प्रकल्पाला भेट देत प्रकल्पाची पाहणी केली. फ्रेंच डेव्हलपमेंट बँक अर्थात एएफडीच्या वतीने पुणे प्रकल्पाला २४५ मिलियन युरो चे कर्ज मिळण्याची शक्यता असल्याने त्यासंदर्भातील पुढील निर्णय लवकरच अपेक्षित असून मेट्रो प्रकल्पातील हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याची माहिती महामेट्रो चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षीत यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेच्या या शिष्टमंडळात सहभागी असलेले फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेचे भारतातील प्रमुख आणि भारत व बांग्लादेश विभागाचे संचालक निकोला फोरनाज, बँकेच्या शाश्वत उर्जा व वाहतूक विभाग प्रकल्पाचे प्रमुख मॅथ्यु वेरडूर आणि प्रकल्प प्रमुख रजनीश अहुजा, महामेट्रो'चे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम् आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलाताना डॉ. ब्रिजेश दिक्षीत म्हणाले की, महामेट्रो अंतर्गत होत असलेल्या या पुणे मेट्रो प्रकल्पासाठी ६० टक्के कर्जाऊ रक्कमेची आवश्यकता आहे. प्रकल्पासाठी ६०० मिलियन युरो हे युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेने तर २४५ मिलियन युरो हे फ्रेंच डेव्हलपमेंट बँक अथवा केएफडब्लू जर्मनी यांकडून कर्ज

स्वरूपात घेण्याची केंद्र सरकारची योजना आहे. या संदर्भात कर्ज देतानाची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दृष्टीने फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेच्या शिष्टमंडळाकडून आज प्रकल्पाची पाहणी करण्यात आली आहे. या अंतर्गत त्यांनी पुणे मेट्रो प्रकल्पात असलेल्या शिवाजीनगर न्यायालय ते रामवाडी आणि पिंपरी – चिंचवड महापालिका ते रेंज हिल्स या मार्गांची पाहणी केली. याबरोबरच मेट्रो कास्टिंग यार्ड आणि ज्या ठिकाणी व्हाया डक्ट टेंडर काम सुरू असते त्या भागाचीही पाहणीही केली. फ्रेंच डेव्हलपमेंट बँकेच्या नियमानुसार ही प्रक्रिया होत असून त्यांच्या नियमाप्रमाणे हे कर्ज आपल्याला उपलब्ध होऊ शकेल. या संपूर्ण प्रक्रीयेसाठी आणखी चार ते सहा महिन्यांचा अवधी जाणार असून आम्ही याबद्दल सकारात्मक आहोत, असेही डॉ. दिक्षीत यांनी यावेळी स्पष्ट केले.
मेट्रो प्रकल्पाला दिलेल्या भेटीबद्दल बोलताना निकोला फोरनाज म्हणाले की, या आधी महामेट्रोच्या बरोबर आम्ही काम केले आहे. या अंतर्गत आम्ही नागपूर मेट्रोला कर्ज दिले आहे. याशिवाय बंगळूरु आणि कोची मेट्रोसाठी देखील आम्ही कर्ज दिले आहे. पुणे मेट्रो बद्दल आम्ही सकारात्मक असून आम्ही मेट्रो मार्गिके बरोबरच इतर अनेक गोष्टींचा अभ्यास करीत आहोत. या पाहणी नंतर कर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आम्हाला चार ते सहा महिन्याचा अवधी लागणार आहे . कर्जाच्या प्रक्रीयेबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले की, फ्रेंच डेव्हलपमेंट बँक ही मुख्यत: वाहतूक क्षेत्रात सार्वजनिक वाहतूक उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे. या अंतर्गतच भारतामध्ये उत्तम सार्वजनिक वाहतूक व्हावी यासाठी आम्ही आर्थिक पाठबळ देण्याचा प्रयत्न करीत आलो आहोत. पुणे मेट्रोला देत असलेले हे कर्ज हा त्याचाच एक भाग असून आम्ही पुणे मेट्रोला मदत करण्यास उत्सुक आहोत. या शिष्टमंडळाने आज मेट्रो प्रकल्पाचे सल्लागार असलेल्या मिटकॉनच्या पर्यावरण व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी विभागाचे सदस्य यांबरोबर दोन्ही मार्गिकांसाठी पर्यावरण संवर्धन अहवाल, या मार्गावरील वृक्षांचे पुनरोपण आणि हानी पोहोचलेल्या वृक्षांच्या बदल्यात आणखी वृक्षांचे रोपण यांविषयावरही संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. याबरोबरच प्रकल्प पूर्ण होण्याचा अवधी आणि भविष्यात कराव्या लागणा-या उपाययोजना यांवरही यावेळी चर्चा करण्यात आली.